धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित,

# कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लिं),

# ता.कन्नड जि.औरंगाबाद.

## विद्यार्थी समाधान सर्वेक्षण अहवाल

## शैक्षणिक वर्ष 2017- 2018

शैक्षणिक वर्ष 2017- 18 मधील बीए व बीएससी शाखेच्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून समाधान सर्वेक्षण घेण्यात आले सदरील सर्वेक्षणात पुढील निष्कर्ष मिळाले.

1. सदरील सर्वेक्षण करताना बीए व बीएससी एकूण असे शंभर विद्यार्थी सहभागी होते विद्यार्थ्यांमधील लिंगनिहाय प्रमाण मुली 40 मुले 60 असे होते.
2. 65 टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक आम्हाला अभ्यास व्यतिरिक्त उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन देतात याविषयी सहमती दर्शविली आहे.
3. 75 टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक आमच्यातील बलस्थाने ओळखून आम्हाला पूर्णपणे प्रेरित करतात असे सांगितले.
4. 90% विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रशिक्षण, विद्यार्थी विनिमय, क्षेत्रभेट यासारख्या संधी नेहमी उपलब्ध करून दिल्या जातात असे नमूद केले.
5. शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात कितपत सक्षम आहेत असे विचारले असता 50 टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक नेहमी प्रभावी संवाद साधतात असे सांगितले.
6. महाविद्यालयातील शिक्षक विद्यार्थ्यांची आवड त्यानुसार पाठ्यक्रम आणि त्यांचे फलित याबाबत कसे सूचित करतात असे विचारले असता सर्वाधिक 45 टक्के विद्यार्थ्यांनी प्रत्येक वेळी सुचित करतात असे नमूद केले.
7. महाविद्यालयातील शिक्षक शिक्षणाच्या बाबतीत सामाजिक व भावनिक विकास कसे साधतात असे विचारले असता 60 टक्के विद्यार्थ्यांनी खूप छान सामाजिक व भावनात्मक विकास साधतात असे सांगितले.
8. संस्था शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सातत्यपूर्ण गुणवत्ता विकास नियंत्रण व आढावा घेते का असे विचारले असता 75 टक्के विद्यार्थ्यांनी सहमती दर्शवली.

9. महाविद्यालयातील अध्ययन अध्यापन पद्धतीचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना--

   A. विज्ञान शाखेसाठी पूर्णवेळ प्राध्यापकांची भरती करावी.
   B. ग्रंथालयात विज्ञान शाखेची पुस्तके वाढवावी.
   C. कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष द्यावे.

10. विद्यार्थी समाधान सर्वेक्षणातील मुद्द्यांचा विचार केल्यानंतर असे लक्षात आले की महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी अध्ययन, अध्यापन व अभ्यासा वित्तरिक्त उपक्रमाविषयी समाधानी आहेत.

PRINCIPAL
Arts and Science College
Chincholi (Li.) Tq.Kannad
Dist.Aurangabad.